# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.03.2025** **वार-रविवार**

---

<u>मुख्यमंत्री</u>

गटशेतीच्या माध्यमातून शेतक-यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणता येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. गट शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात यांत्रिकीकरणाचा तसंच आधुनिक शेती पद्धतीचा वापर करता येतो; त्यामुळे भविष्यात गट शेती शिवाय पर्याय नाही, असं ते म्हणाले. बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रिडासंकुलात आयोजित सत्यमेव जयते फार्मर कप २०२४चं पुरस्कार वितरण आज मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालं; त्यावेळी ते बोलत होते. कृषी मंत्री माणिकराव कोकाटे, पानी फाऊंडेशनचे संस्थापक, अभिनेते आमीर खान, किरण राव, सत्यजित भटकळ आदी यावेली उपस्थित होते.

<u>शहीददिन</u>

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी स्वतःच्या प्राणाची आहुती देणाऱ्या शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या समरणार्थ आजचा दिवस शहीद दिन म्हणून पाळण्यात येत आहे. या निमित्तानं पुण्यात विविध संस्थांच्या वतीनं तीनही हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातही कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र - कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर, यांनी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

<u>साखरपुरस्कार</u>

देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखान्याचा वसंतदादा पाटील पुरस्कार पुण्याच्या आंबेगाव तालुक्यातील भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याला जाहीर झाला आहे. राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या वतीने साखर कारखान्यांना देण्यात येणाऱ्या पुरस्कारांची घोषणा संघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेमध्ये केली. केंद्रीय सहकारमंत्री अमित शहा यांच्या हस्ते या पुरस्कारांचं वितरण होणार आहे. साखर कारखाना महासंघातर्फे दिल्या जाणाऱ्या २५ पुरस्कारांपैकी दहा पुरस्कार महाराष्ट्रातील साखर कारखान्यांना मिळाले आहेत.

<u>स्नेहाधारपुरस्क</u>

सामाजिक कार्याच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना काल पुण्यात स्नेहाधार गौरव पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं. पेणच्या अहिल्या महिला मंडळाच्या संस्थापिका वासंती देव आणि बीड जिल्ह्यातील कळसंबर इथ ‘आपला परिवार’ वृद्धाश्रमाची स्थापना करणाऱ्या मनीषा पवार यांचा यावेळी गौरव करण्यात आला. अहिल्यानगरच्या स्नेहालय संस्थेअंतर्गत संचलित पुण्यातील स्नेहाधार संस्थेच्या वतीनं हे पुरस्कार देण्यात आले. गिरीप्रेमी संस्थेचे संस्थापक उमेश झिरपे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण झालं. समाजकार्यात महिला शक्ती किती सक्षम असू शकते हे ‘स्नेहाधार गौरव पुरस्कारा’तून समाजापुढे येत आहे, असं झिरपे यावेळी म्हणाले.

आयएमए

भारतीय वैद्यकीय संघटना अर्थात आयएमएच्या पुणे शाखेच्यावतीने वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना आज विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आलं. डॉक्टर बाळासाहेब देशमुख यांना जीवनगौरव पुरस्कार, तर डॉक्टर श्रीपाद कोटबागी यांना सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल गौरवण्यात आलं. डॉक्टर पियुष चौधरी यांना कर्तुत्ववान युवा डॉक्टर पुरस्कार, तर डॉक्टर अभिमन्यू केळकर यांना दिवंगत डॉक्टर एम जी शहाडे पुरस्काराणं गौरवण्यात आलं.

राष्ट्रीयलोकअदालत

पुणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष महेंद्र महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली काल राष्ट्रीय लोक अदालतीचं आयोजन करण्यात आलं होतं. यामध्ये वादपूर्व १ लाख २५५ आणि तडजोडीचे ३८ हजार ५७० असे एकंदर १ लाख ३८ हजार ८२५ दावे निकाली काढण्यात आले.

सदानंदमोरे

आजच्या कवींना ओवीबद्ध, छंदबद्ध लिखाणाचं तंत्र, शास्त्र अवलंबावं असं  वाटत नाही, अशी खंत ज्येष्ठ साहित्यिक आणि विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी आज पुण्यात व्यक्त केली. रंगत-संगत प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा काव्य जीवनगौरव पुरस्कार; ‘वृत्तबद्ध कविता : कला आणि शास्त्र’ या ग्रंथाच्या लेखिका, ज्येष्ठ कवयित्री वर्षा कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला; त्यावेळी ते बोतल होते.

नमोज्ञानेश्वरा

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या सप्तशतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जन्मवर्षानिमित्त डॉ. रामचंद्र देखणे साहित्य-कला प्रतिष्ठाननं काल पुण्यात ‘नमो ज्ञानेश्वरा’ या विशेष कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. यामध्ये संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांनी संतवचनं, भगवत् गीतेतील श्लोक, ज्ञानेश्वरीतील दाखले, आणि संस्कृत सुभाषि तांच्या माध्यमातून ज्ञानेश्वर माऊलींचं श्रेष्ठत्व उपस्थितांसमोर मांडलं. संत ज्ञानेश्वरांनी रचलेले अभंग, काव्यरचना यांचं सादरीकरणही यावेळी करण्यात आलं.

पुणेमनपामहसूल

पुणे महापालिकेने २०२४-२५ या आर्थिक वर्षात फेब्रुवारी महिन्यापर्यंत ८९५ बांधकाम प्रकल्पांना परवानगी दिली आहे. त्यातून महापालिकेला आतापर्यंत १ हजार ९८९ कोटी रुपयांचा महसूल मिळाला असल्याची माहिती पुणे महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली.

बाजारसमिती

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध  राज्यातून नव्वद ट्रक फळभाज्यांची आवक झाली. सिमला मिरची, भुईमूग शेंग, शेवगा, आणि फ्लॉवरच्या भावात घसरण झाली तर सिमला मिरचीचे भाव वधारले आहेत. उन्हाचा कडाका वाढल्याने पालेभाज्यांच्या भावात वाढ झाली.  फळ बाजारात लिंबं आणि पपई महागले आहेत. फुल बाजारातही  मंदीचं वातावरण आहे.

हवामान

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 तर किमान तापमान 17 पूर्णांक 2 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचं पुणे वेधशाळेनं म्हटलं आहे.